# पुणे विद्यापीठ

परीक्षा विभाग

दूरध्वनी क्र.०२०–२५६०१२०४
इंजि.– २५६०१२११
मॅनेज/लॉ/शि.शा. .–२५६०१२१६
आर्टस.– २५६०१२१३
सायन्स.– २५६०१२१४/कॉमर्स–२५६०१२१५
फार्मसी/मेडिकल–२५६०१२२०

टेलिग्राफ : "युनिपुणे"
फॅक्स –०२०–२५६०१२०८
फॅक्स –०२०–२५६०१२०४

वेबसाईट:www.unipune.ac.in
ई.मेल coe@unipune.ernet.in

---

वी.परीक्षा/८५ **परिपत्रक** दि: ६/५/२०१२

या परिपत्रकाव्दारे सर्व संबंधित संलग्न महाविद्यालये व संस्था यांना कळविण्यात येत आहे की, एम. पुक्टो या शिक्षक संघटनेने त्यांच्या विविध मागण्यांसाठी आंदोलन सुरु केलेले आहे. सदर आंदोलनाचा भाग म्हणून त्यांनी विविध परीक्षांच्या उत्तर पत्रिकांचे मुल्यांकन करण्यावर बहिष्कार टाकलेला आहे. त्यांच्या या बहिष्कार आंदोलनाचा विद्यार्थ्यांच्या निकालावर परिणाम होणार आहे. विद्यार्थ्यांचे निकाल उशीरा जाहिर झाल्यास त्यांचे शैक्षणिक नुकसान होण्याची शक्यता आहे. तसेच काही विद्यार्थी रोजगाराच्या संधी पासून वंचीत राहणार आहेत.

(मा.प्रधान सचिव उच्च व तंत्रशिक्षण, महाराष्ट्र शासन यांनी संदर्भ: अ.शा. क्रमांक–संकीर्ण–२०१२/(१६४/१२)विशि–३,४ मे,२०१२ हे पत्र निर्गमित केलेले आहे.

उत्तर पत्रिकांचे मुल्यांकन करण्यासाठी विद्यापीठाने परिक्षकांच्या नियुक्त्या केलेल्या आहेत, परंतू आंदोलनामुळे संबंधित अध्यापक मुल्यांकनासाठी मुल्यांकन केंद्रावर गेलेले नाहीत. अशी माहिती प्राप्त झालेली आहे.

या परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी खालीलप्रमाणे सूचना निर्गमित करण्यात येत आहेत. तरी त्या सूचनांनुसार तात्काळ कार्यवाही करण्यात यावी.

१. जे अध्यापक नियुक्ती करुनही मुल्यांकन केंद्रावर गेलेले नाहीत त्यांची नावे विद्यापीठास दि. ८/५/२०१२ रोजी दु.३.०० वाजेपर्यंत कळवातीत.
२. जे अध्यापक मान्यता प्राप्त आहेत व ज्यांची नियुक्ती झालेली नाही अशा अध्यापकांची नावे विद्यापीठास दि. ८/५/२०१२ रोजी दु.३.०० वाजेपर्यंत कळवावीत.
३. आपल्या महाविद्यालयातील निवृत्त झालेल्या अध्यापकांची नावे दि. १० मे, २०१२ पर्यंत विद्यापीठास कळवावीत.
४. परिक्षेचे काम, उत्तरपत्रीकांचे मुल्यांकन करणे महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ नुसार अध्यापकांवर बंधन कारक असून सदर काम नाकारणे, टाळाटाळ करणे या बाबी गंभीर स्वरुपाच्या असून सदर बाबी संदर्भात शिस्तभंगाची कार्यवाही होऊ शकते याची जाणीव संबंधीतांना मा. प्राचार्य यांनी करुन दयावी.

( विद्यापीठ कायदा :३२(५)(जी) It shall be obligatory on every teacher and the non-teaching employee of the university, affiliated, conducted or autonomous college or recognized institution to render necessary assistance and service in respect of examinations of the universitry. If any teacher or non-teaching employee fails to comply with the order of the university or college or institution, in the respect,it shall be treated as misconduct and the employee shall be liable for disciplinary action. )

वरील प्रमाणे कार्यवाही करुन कार्यवाहीचा अहवाल ई मेल व्दारा विद्यापीठास पाठवावा.

परीक्षा नियंत्रक

प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी
मा. प्राचार्य, सर्वसंलग्नित महाविद्यालये
मा. संचालक, सर्व संलग्नित संस्था.
मा. संचालक, मुल्यांकन केंद्र

अ.शा.पत्र क्रमांक-संकीर्ण-२०१२/(२६,४/१२)/तांशि-१
उच्च व तंत्रशिक्षण विभाग
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक - ४ मे २०१२

संजय कुमार

विषय : एमफुक्टो या शिक्षक संघटनेने उत्तरपत्रिकांच्या मुल्यांकनाच्या कामावर घातलेल्या बहिष्काराबाबत

प्रिय श्री [illegible]

एमफुक्टो या शिक्षक संघटनेने केलेल्या मागण्यांच्या अनुषंगाने शासनाने सकारात्मक दृष्टीकोन ठेऊन आवश्यक ती कार्यवाही सुरु केलेली आहे. तसेच या संदर्भात मा.मंत्री महोदयांकडे दि.२५.४.२०१२ रोजी संघटनेच्या पदाधिका-यांसमवेत झालेल्या बैठकीमध्ये सर्व वस्तुस्थिती अवगत करण्यात आलेली आहे. त्यानंतरही एमफुक्टो संघटनेने उत्तरपत्रिकांच्या मुल्यांकनाच्या कामावरील बहिष्कार अद्यापही मागे घेतलेला नाही. एमफुक्टो संघटनेने उत्तरपत्रिकांच्या मुल्यांकनाच्या कामावर घातलेल्या बहिष्कारामुळे विद्यापीठाने घेतलेल्या परीक्षांचे निकाल उशिरा लागणार आहे. परीक्षांचे निकाल उशिरा लागल्यास पुढील अभ्यासक्रमांचे प्रवेश उशिरा होतील व त्यापुढील शैक्षणिक कार्यक्रमावर त्याचा विपरीत परिणाम होईल. परीक्षांचे निकाल उशिराने लागल्यास विद्यार्थ्यांना देश / परदेशातील उच्च शिक्षणास मुकावे लागेल. तसेच त्यांच्या रोजगाराच्या संधी हुकतील. शासनाचे विद्यार्थी केंद्रीत धोरण आहे. एमफुक्टो संघटनेने उत्तरपत्रिकांच्या मुल्यांकनाच्या कामावर घातलेला बहिष्कार विचारात घेऊन विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हितास बाधा येऊ नये म्हणून विद्यापीठांनी उत्तरपत्रिकांच्या मुल्यांकनाच्या कामासाठी पर्यायी मार्गाचा अवलंब केला असेल असे शासनास अपेक्षीत आहे. असे असले तरी वरील बाबी व राज्यातील विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेऊन उत्तरपत्रिकांच्या मुल्यांकनाच्या कामासाठी खालीलप्रमाणे पर्यायी मार्गाचा अवलंब करण्याच्या सूचना देण्यात येत आहेत :-

(i) त्या त्या विद्यापीठ क्षेत्रातील शासकीय महाविद्यालय / संस्था मधील सरसकट सर्व अध्यापकांना (हंगामी व कंत्राटी धरुन) उत्तरपत्रिका मुल्यांकनाचे काम देण्यात यावे.

(ii) एमफुक्टो संघटनेने उत्तरपत्रिकांच्या मुल्यांकनाच्या कामावर घातलेला बहिष्कार व त्याअनुषंगाने सुरु केलेल्या आंदोलनामध्ये ज्या अध्यापकांचा समावेश नाही त्या अध्यापकांकडून उत्तरपत्रिकांच्या मुल्यांकनाचे काम करुन घेण्यात यावे.

(iii) वरील दोन्हीही पर्यायांचा वापर केल्यानंतरही मनुष्यबळ कमी पडल्यास सेवानिवृत्त झालेल्या अध्यापकांकडून उत्तरपत्रिकांच्या मुल्यांकनाचे काम करुन घेण्यात यावे.

२. एमफुक्टो या संघटनेने केलेल्या मागण्यांच्या अनुषंगाने सदर संघटनेसोबत चर्चा सुरु आहे. त्यामुळे वरील पर्यायी व्यवस्थेचा वापर एमफुक्टो संघटनेकडून बहिष्कार मागे घेईपर्यंतच करण्यात यावा. त्यानंतर नियमित अध्यापकांकडून उत्तरपत्रिकांच्या मुल्यांकनाचे काम करुन घेण्यात यावे.

३. तसेच एमफुक्टो संघटनेने सुरु केलेल्या आंदोलनामध्ये ज्या अध्यापकांचा सहभाग आहे अशा अध्यापकांची महाविद्यालयनिहाय (प्राचार्यांकडून प्रमाणित करुन) माहिती शासनास कृपया तात्काळ सादर करावी.

आपला विश्वासु

(संजय कुमार)

डॉ.संजय चहांदे,
कुलगुरु,
पुणे विद्यापीठ,पुणे.